## उमद-महाराष्ट्र राज्य ग्रामाण जावनान्नता आभयान

## जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,

### जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,स्टेशन रोड,परभणी

फोन नं.242452-223388
E-mail-parbhanimsrlm@gmail.com

जाक्रं/एमएसआरएलएम/आस्था/ ३८८ /२०२१
दिनांक ०२/०५ /२०२१

**दरपत्रक मागणीपत्र.**

**प्रति,**

------------------------------------------
------------------------------------------

**विषय:- दरपत्रक सादर करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची जिल्हयामध्ये पुर्णत: इंटेंन्सीव्ह तत्वावर सुरु असुन, अभियानांतर्गत जिल्हा व तालुकास्तरीय कार्यालयीन उपयोगास्तव व अभियानांतर्गत विविध प्रशिक्षणाकरिता लागणारे फॉर्म छपाई करणे आवश्यक आहे.

त्याकरिता खालील विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आल्यानुसार विविध फॉर्म छपाई करणेसाठी खुल्या बाजारातुन खालील अटी व शर्तीचे अधिन राहुन, दोन लिफाफे पध्दतीने दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

## साहीत्यचे विवरणपत्र

| अ.क्र. | विवरण | दर प्रति नग रु. (कर वगळता) |
|---|---|---|
| १ | A ४ Size Paper (One Side Opset Printing<br>Paper- ७० GSM | |
| २ | A ४ Size Paper (Two Side Opset Printing<br>Paper- ७० GSM | |
| ३ | Legal Size Paper (One Side Opset Printing<br>Paper- ७० GSM | |
| ४ | Legal Size Paper (Two Side Opset Printing<br>Paper- ७० GSM | |
| ५ | Colour File Cover<br>Legal Size Paper (One Side Opset Printing<br>Paper- २०० GSM | |
| | **Total:-** | |

**अटी व शर्ती:-**

१. दरपत्रक सादर करण्याचा कालावधी पत्राचे दिनांकापासुन ०७ दिवसाचा राहील.
२. विहीत कालावधीत व कार्यालयीन वेळेमध्ये दरपत्रके सादर करण्याची संपुर्ण जबाबदारी ही पुरवठादाराची राहील.
३. विहीत मुदतीनंतर प्राप्त होणा-या दरपत्रकाचा समावेश संपादणूक प्रक्रियेमध्ये करण्यात येणार नाही.
४. दरपत्रके ही दोन लिफाफा पध्दतीने ऑफलाईन पध्दतीने जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,स्टेशन रोड,परभणी येथे सादर करणे आवश्यक राहील. ईमेलव्दारे प्राप्त होणा-या दरपत्रकाचा संपादणूक प्रक्रियेमध्ये समावेश केला जाणार नाही.
५. पोस्टाने सादर केलेली दरपत्रके विहीत वेळेत प्राप्त न झाल्यास त्याची सर्वस्वी जबादारी ही संबंधित पुरवठादाराची राहील. त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

६. तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर केलेल्या कागदपत्राच्या प्रति साक्षांकित केलेल्या असाव्यात.
७. तांत्रिक लिफाफ्यामध्ये पात्र ठरलेल्याच पुरवठादाराचे आर्थिक लिफाफे उघडण्यात येतील.
८. पुरवठादाराचे देयकामधुन अनुषंगीक कर(उदा-GSTIN/TDS etc.) कपात करुन, देयक अदा करण्यात येईल.
९. सदर खरेदी प्रक्रिया रद्द करण्याची/पुढे ढकलण्याबाबतचे सर्वस्वी अधिकार निम्न स्वाक्षरीकर्त्यास राहतील.
१०. सदर खरेदी प्रक्रियेदरम्यान न्यायालयीन प्रक्रिया उद्भवल्यास जिल्हा न्यायालय परभणी हे कार्यक्षेत्र राहील.
११. सेवा पुरवठादाराचा समावेश शासकिय संस्था/महामंडळे/स्वायत्त संस्था/केंद्र व राज्य शासनाचे विभाग यांचेव्दारे काळयायादीमध्ये समाविष्ठ नसावे. सेवा पुरवठादाराचा समावेश काळ्या यादीमध्ये असल्यास सदर सेवा पुरवठादाराची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.
१२. निधीच्या उपल्बधतेनुसार देयकाची अदायगी करण्यात येईल. देयक अदा करणेकरिता विलंब झाल्यास पुरवठादारास सदर रक्कमेवर व्याजाची मागणी करता येणार नाही व त्याकरिता न्यायालयात दाद मागता येणार नाही.
१३. पुरवठादारांनी सदर दरपत्रके ही त्यांचे आस्थापनेच्या / दुकानाच्या लेटरहेड वर सही शिक्यानिशी सादर करावीत.
१४. पुरवठादारास साहीत्य कार्यालयाने सुचित केल्यानुसार जिल्हा/तालुकास्तरावर पोच करण्याची जबाबदारी ही पुरवठादाराची राहील. त्यांकरिता कोणतेही अतिरीक्त शुल्क अदा केले जाणार नाहीत.
१५. पुरवठादाराची निवड हि एकुण दराच्या आधारावर सर्वात न्युनतम आसणा-या पुरवठादाराची निवड करण्यात येईल.
१६. सदरील मंजुर दर हे ०१ वर्ष कालावधीकरिता वैध राहतील. सदर दरास मुदतवाढ देण्याचे किंवा नव्याने प्रक्रिया मागणी करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीकर्त्यास राहतील.
१७. सदरील दरपत्रक/सुचना जिल्हा परिषदेच्या http://zpparbhani.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.तसेच,जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येईल.
१८. सदर संपादणुक प्रक्रियेसंबंधितचे संपुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकर्त्याने राखुन ठेवले आहेत.

**तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावयाची दस्तऐवजे:-**

१. पुरवठा करणा-या आस्थापनेचे GSTIN प्रमाणपत्र.(लागु नसल्यास Charterd Accountant/Authorised Tax Consultant) यांचे प्रमाणपत्र.
२. PAN Card.
३. मागील तिन वर्षामध्ये किमान १०.०० लक्ष रुपये पर्यंतची उलाढाल असल्याबाबत Charterd Accountant/Authorised Tax Consultant) यांचे प्रमाणपत्र.
४. आस्थापनेचे बॅक पासबुकची छायाप्रत.

**आर्थिक लिफाफ्यामध्ये सादर करावयाची दस्तऐवज:-**

पुरवठादारांनी त्यांचे आस्थापनेच्या / दुकानाच्या लेटरहेडवर वरिल विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आल्यानुसार दर (भारतीय चलनामध्ये) त्यांचे सही शिक्यानिशी सादर करावीत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.तथा**
**जिल्हा अभियान संचालक,एमएसआरएलएम,परभणी**